*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

# UNIT 2
# PHILOSOPHY OF GEETA
# श्रीमद्‌भगवत्‌गीतेचे तत्त्वज्ञान



## प्रस्तावना :

महाभारत या महाकाव्यातील महत्वाचा भाग म्हणजे गीता होय.वैदिक वाङमयात महाभारताला महाकाव्याचा दर्जा आहे.दुसरे महाकाव्य म्हणजे रामायण.ज्याच्या वाचनाने अनेक पिढ्यांना निरतिशय आनंद लाभला, जणू मुक्तिचा मार्ग गवसला त्या महाकाव्याचा गीता हा गाभाच मानला पाहिजे.।गीता म्हणजे गायिलेली.गाण्याजोगे असे काही काव्य, कविता,ओळी म्हणजे गेय असणे.गीता हा गेय विचारआहे.श्रीकृष्णाने त्याचे म्हणणे गावून दाखविले ती गीता झाली.श्रीकृष्णाला भगवान - ईश्वर समजले जाते. म्हणून गीतेचे पूर्ण नाव *'श्रीमद्‌भगवतगीता'* असे आहे.



गीतेत सर्व भारतीय दर्शनांचे मूळ विचार मांडलेले आहेत.म्हणून ती भारतीय दर्शनांचा मूलाधार समजली जाते.त्याकारणाकरिताच विनोबाजींनी 'महाभारत ही गाय असून गीता तिचे दूध आहे' असा गौरव केला आहे.अर्थात या म्हणण्याचे मूळ स्मृतिंमध्ये आहे.ते असे :

*सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपाललनंदन:*
*पार्थो वत्स: सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत्*

'' सर्व उपनिषदे या कोणी गायी असून भगवान श्रीकृष्ण हे दूध काढणारे गवळी असून बुध्दिमान अर्जुन हा त्या गायीना पान्हा आणणारा भोक्ता वत्स आणि (अशी सपूर्व सामग्री जुळून आल्यांनंतर ) जे दूध काढले गेले तेच गीतामृत'' होय.

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



गीतेचा पहिला मराठी(प्राकृत) अनुवाद श्री. ज्ञानेश्वरांनी केला.तीच ज्ञानेश्वरी होय.ती महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदायाची, वारकरी पंथाची गीता बनली.गीता हा प्रस्थान त्रयीतील एक ग्रंथ होय.गीतेतील कर्मविचार हाच तत्त्वज्ञानात्मक दृष्ट्या महत्वाचा मानला जातो.इतर सर्व साहित्याप्रमाणे गीता हजारो वर्षे मौखिक परंपरनेने जपली गेली. भारतात निर्माण झालेलया विविध जीवनविचारांचा समन्वय गीतेत आहे ज्याला हिंदू जीवनपध्दती म्हणता येईल तिचा आदर्श आणि तात्विक समर्थन गीतेतच सापडते.ज्याला भारतीय जीवनाचा अभ्यास करावयाचा आहे त्याला हा ग्रंथ समजावून घेतलाच पाहिजे.

## 2. 1 : अर्जुनाचा प्रश्न आणि कृष्णाचे उत्तर

गीतेची वैशिष्ट्ये म्हणजे गीता अतिशय गंभीर प्रसंगी सांगितली गेली.त्या प्रसंगी केवळ देशाचे नव्हे तर धर्माचे (नीतीचे) भवितव्य पणाला लागले होते.हा ग्रंथ सुगम व मोहक शैलीत असून संवादरूपाने लिहिला असल्याने त्यात नाट्यमयता आहे.गीतेतील उपदेश हा त्याचा केंद्रबिंदू आहे. गीतेतली समस्या नैतिक आहे, पण तत्त्वज्ञानातील सर्वच प्रश्नांची उत्तरे गीता देते, असे मात्र नव्हे, हे विसरता कामा नये.गीतेत मुख्यत: दोन मुद्दे आहेत : *गीता कर्म करण्यास सांगते आणि त्याचवेळी कर्मसंन्यास कसा साधावा*, त्याचे स्पष्टीकरण देते.हे लक्षात ठेवून अर्जुनाचा प्रश्न व श्रीकृष्णाचे उत्तर पाहू.

### अर्जुनाचा प्रश्न

३० * श्रीमद्भगवद्गीता *

*सञ्जय उवाच*

**एवमुक्त्वार्जुनः सङ्ख्ये रथोपस्थ उपाविशत्।**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः॥**

सञ्जय बोले—रणभूमिमें शोकसे उद्विग्न मनवाले अर्जुन इस प्रकार कहकर, बाणसहित धनुषको त्यागकर रथके पिछले भागमें बैठ गये॥ ४७॥

*ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः॥ १॥*

प्रारंभी अर्जुन विषण्ण मनस्थितीत लढण्याचे नाकारतो.श्रीकृष्णाने केलेल्या उपदेशानंतर तो पूर्ण निश्चयाने लढतो.अर्जुनाला आपले बंधु,ज्येष्ठ नातेवाईक, गुरुजन यांचा मोह पडला असून त्यांना युध्दात ठार मारावे लागण्याची वेळ आल्याने त्याचे मन विषादाने भरले आहे.त्या अवस्थेतच तो प्रश्न विचारतो. गीतेच्या या पहिल्या अध्यायाला *'अर्जुनविषाद योग'* असे नाव आहे.अर्जुनाचा प्रश्न असा :

**''आयुष्याकडे गंभीर दृष्टीने पाहणा-याने कोणते कर्म करावे आणि कोणते करु नये ? कार्य कर्म कोणते आणि अकार्य कोणते? त्यातील योग्य कर्म कोणते आणि अयोग्य कोणते? कर्माच्या योग्यायोग्यतेचा निकष कोणता ? ''**

Dep… …gammer College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

हा प्रश्न जसा अर्जुनाला पडला तसा प्रत्येक व्यक्तीलाही पडतो.नीतिशास्त्राचा हा मूलभूत प्रश्न असून त्याचे उत्तर अवघड आहे.गीता म्हणते *‘किं कर्म किमकर्मेति कवयोप्यत्र मोहिता:* । (4.16)म्हणजे कर्म काय आणि अकर्म काय याबाबतीत बुध्दिमान पुरुषही संभ्रमात पडतात !

या प्रश्नावर श्रीकृष्ण जे उत्तर देतो त्यातून गीतोपदेशाची मांडणी तयार होते.कृष्ण कर्मयोग सांगतो.म्हणून श्रीकृष्णाचे उत्तर म्हणजे कर्मयोग होय ! कर्मयोग हा तांत्रिक शब्द असून तो गहन अर्थाने भरलेला व भारलेला आहे.त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे :



## श्रीकृष्णाचे उत्तर

## गीताप्रणीत कर्मयोग

गीतेने कर्मयोग सांगितला.तो असा : कर्म अटळ आहे, ते केलेच पाहिजे.कोणत्याही माणसाला कर्म हे केलेच पाहिजे.आयुष्य म्हणजे कर्मांची अखंड मालिका होय. कर्म केल्याविना व्यक्ती एक क्षणभरही जगू शकत नाही. *नहि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । (3.5).*अर्थात कर्म म्हणजे केवळ शरीराची हालचाल अथवा शरीरचेष्टा नव्हे.अमुक एका उद्देशाच्या पूर्तीसाठी केलेली कृती म्हणजे कर्म, जे करणे, न करणे अथवा अन्य त-हेने करणे आपल्या स्वाधीन असते ते कर्म होय.

पण गीताकालात संन्यासाचा निष्क्रिय मार्ग आणि कर्ममय जीवनाचा क्रियाशील मार्ग असे दोन मार्ग होते.पहिल्या निवृत्ती मार्गात समाजापासून दूर जावे अशी प्रेरणा होती तर दुसऱ्या प्रवृत्तीपर मार्गात सामाजिक कर्तव्ये करावीत ही प्रेरणा होती, पण त्यात स्वार्थाचा अंश होता.हळूहळू कोणतीही कर्मे केवळ स्वार्थानेच केली जातील अशीच मनाची धारणा होती आणि आजही आहे.

गीतेच्या म्हणण्यानुसार हीच सामाजिक कर्तव्ये व्यक्तिने स्वार्थरहित बुध्दिने आणि केवळ कर्तव्य भावनेनेच करावीत. हाच खरा कर्मसंन्यास आहे.हा कर्मातील फलाचा संन्यास आहे, कर्माचा नाही, म्हणून ’ कर्मफलसंन्यास ’ हा गीतेचा उपदेश आहे. थोडक्यात *कर्मफलसंन्यास* हे गीतेचे उत्तर आहे.

कर्मनिवृत्ती अथवा कर्मसंन्यास गीतेला मान्य नाही.त्यासाठी गीतेने ’’कामनापूर्तीसाठी करावयाच्या कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास’’ *(काम्यांना कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदु:*। (18.2).) अशी संन्यासाची नवीन व्याख्या केली. ’संन्यास’ या संकल्पनेमागील उदात्तता घ्यावी पण पलायनवाद टाळावा ही गीतेने दिलेल्या समन्वयाची रीत आहे.तात्पर्य असे की, कर्म हे माणसाच्या मागे लागलेलेच आहे.ते त्याला सोडता येणार नाही व त्याने सोडूही नये.

## कर्मबंध आणि मुक्तिची समस्या

पण माणूस कर्मबंधात कसा अडकतो ? त्याचे कारण काय ? आणि त्याच्या मुक्तिचा मार्ग कोणता? गीतेनुसार कर्मफलसंन्यास हाच माणसाच्या मुक्तिचा मार्ग आहे.माणूस कर्मचक्रात अडकतो कारण तो फलाच्या, स्वार्थाच्या मागे लागतो.सामान्यत: असे दिसते की कोणताही माणूस कर्म करताना त्या कर्मापासून कोणतेतरी फल मिळावे, हीच अपेक्षा धरतो.हेच त्याच्या बंधनाचे कारण असते.

कर्मविपाक किंवा कर्मसिध्दान्तानुसार व्यक्तिला कर्म अटळ आणि फलही अटळ आहे.ते टाळू म्हणताही टळत नाही. मग ती कर्मचक्रात व फलचक्रात अडकते, पर्यायाने जनाााफलफलाााात्या विशिष्ट कर्माच्या

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

उद्दिष्टांविषयीची आसक्ती ही त्या कर्मामागील प्रेरणा असते.म्हणजे कोणते जन्ममरणाच्या चक्रात अडकते.म्हणजे कर्मफलाची आसक्ती हेच कर्मबंधाचे कारण असते !

आता कर्म अटळ असेल व फलही अटळ असेल तर सुटका कशी शक्य आहे ? मुक्तिचा मार्ग कोणता ? तर गीतेच्या म्हणण्यानुसार निवृत्तीमार्गापेक्षा प्रवृत्तीमार्ग स्वीकारावा पण कर्मफलत्याग करावा ! त्यासाठी कर्म, कर्मफल यांची नीट उकल मात्र झाली पाहिजे. कर्म कसे करावे, त्याचे भान आले पाहिजे.ते पुढीलप्रमाणे :



## अनासक्त कर्म

कोणते कर्म करावे आणि कोणते करु नये ? कार्य कर्म कोणते आणि अकार्य कोणते? प्रशस्त कोणते आणि अप्रशस्त कोणते ? या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी गीतेने काही मार्ग सुचविले.पहिला असा की, कर्माची नैतिक परीक्षा करावी आणि ती कर्मामागे असलेल्या संकल्पाकडे अथवा बुध्दीकडे लक्ष देऊन करावी. बाह्य कर्म हे जड असल्याने चांगलेवाईटपणा हा जड कर्माला व त्या कर्माइतक्याच जड असलेल्या कर्मफलालाही चिकटत नाही.म्हणूनच कर्मांतर्यामी बुध्दी हीच महत्वाची गोष्ट आहे.*(दूरेण हयवंर कर्म बुध्दियोगात् धनंजय । बुध्दौ शरणमन्विच्छ.....। (2.49*

दुसरा मार्ग असा की, आपले कर्म युक्त अथवा प्रशस्त ठरण्यास बुध्दी कशा प्रकारची पाहिजे ? कोणत्या बुध्दीने कर्मे करावीत ? यावर 'योगयुक्त बुध्दीने कर्मे करावीत' असे गीतेचे उत्तर आहे.*(योगस्थ: कुरु कर्माणि, संगं त्यक्त्वा धनंजय ।* (2.48) संग अथवा आसक्ती सोडून देऊन योगाच्या ठिकाणी स्थिर व्हावे व अशा रीतीने कर्मे करावीत.या ठिकाणी 'आसक्ती सोडणे' आणि 'योगस्थ होणे' या एका पाठीमागून दुसरी अशा घडणा-या दोन भिन्न क्रिया नव्हेत.आसक्ती सोडणे म्हणजेच योगस्थ होणे.योगयुक्त होणे, समत्वबुध्दी संपादणे आणि कर्मातील कौशल्य या सर्वांचे तात्पर्य एकच होय. आता बुध्दीची समतोल अवस्था (समत्वम्) का बिघडते ? याचे खरे कारण असे की, -

बुध्दीचा (अथवा प्रज्ञेचा) तोल बिघडतो तो विकारवशतेने, विशेषत: कर्माच्या फलाविषयीच्या आसक्तीमुळे ! विकाराधीन नसलेली बुध्दी म्हणजेच समतोल बुध्दी. या बुध्दीस (म्हणजेच, प्रज्ञेस) स्थित, निश्चल, अचल, स्थिर इत्यादी विशेषणे गीतेने लावली आहेत. या स्थिरबुध्दीतून (अथवा, स्थित प्रज्ञेतून) कर्म निघावयाचे असेल तर त्याला प्रेरणा ही पाहिजेच. पण ती अनासक्तच असली पाहिजे. फलाविषयी आसक्ती नसणे ही समत्वबुध्दीची खूण आहे.

याला पूरक 'योग: कर्मसु कौशलम्' ही व्याख्या आहे. कर्माच्या ठिकाणी अशा एका कौशल्याची अपेक्षा आहे की, त्यामळे त्याचे बंधकत्व नाहीसे व्हावे व ते युक्त ठरावे. त्या कौशल्याचे नाव *योग.*हे कौशल्य कोणते? एखाद्या कृतीचा केवळ बाह्य, भौतिक भागात नैतिक, अनैतिक काहीच असत नाही. कर्माला नैतिकता येते अनासक्ती अथवा असक्तीमुळे.गीतेने म्हटले आहे की, अविद्वान अथवा सामान्य माणसे ज्याप्रमाणे एखादे कर्म करतात त्याचप्रमाणे जगत्कल्याण इच्छिणा-या विद्वान सत्पुरुषाने करावे.सामान्य माणसाप्रमाणे कर्मफलाच्या आसक्तीसाठी करू नये.तेंव्हा प्रशस्त कर्म करु इच्छिणा-या सज्जनाने जगात अनासक्तपणे वावरले पाहिजे.(3.25). तेव्हा अनासक्ती म्हणजेच कर्म करण्याची खुबी अथवा कौशल्य

Department of Philosophy, Sangamner College Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## कर्तव्य प्रेरणा

कर्मापासून मिळणा-या फलाविषयीची ओढ,ही प्रेरणा जर नसेल तर दुसरी कोणती प्रेरणा व्यक्तिच्या समत्वबुध्दीच्या ठिकाणी शक्य आहे ? तर *'विशुध्द कर्तव्यप्रेरणा'* हेच उत्तर संभवते. तेव्हा कर्तव्यभावना ही एकच प्रेरणा ज्या बुध्दीत वास करते ती समत्वबुध्दी अथवा योग होय. *'समत्वं योग उच्यते'* या व्याखेचा हा अर्थ निघू शकतो.

'अमुक कृतीचे अमुक फल मिळाले पाहिजे' या वृत्तीतील *'मला'* एवढा भाग आसक्तीचा निदर्शक आहे. तो काढल्यावर तीच इच्छा वैश्विक बनते आणि विशुध्द कर्तव्यबुध्दी ही कर्मास प्रेरक ठरते.अशा रीतीने वागणे म्हणजे अनासक्त बुध्दीने कर्म करणे. आसक्ती म्हणजे इच्छेला अथवा वासनेला चिकटलेला अहंकार. आपल्या बहुतेक वासना अहंकाराच्या रंगाने रंगलेल्या असतात. अहंकाराचा तो रंग काढून विरागी वासनेस वैश्विक स्वरुप दिल्यास जी प्रेरणा राहते, ती कर्तव्यभावनेची प्रेरणा होय.

स्वत:चे मूल आजारी असता कावरीबावरी होऊन, चिंतेने व्याकुळ होऊन आई जी सेवा करते, त्यामागील प्रेरणा आसक्तियुक्त असते. '*माझे* मूल बरे झालेच पाहिजे. त्याचे हाल मी पाहू शकत नाही' अशा प्रकारच्या भावनेतून ती प्रेरणा प्रकट होत असते.पण माझा एखादा  शेजारी आजारी पडला तर कदाचित त्याच्याविषयी मला सहानुभूती अथवा ममत्व बिलकुल वाटणार नाही.अशा परिस्थितीत केवळ कर्तव्यभावनेने मी त्याची सेवा करणे, हे कर्तव्य होय. या ठिकाणी माझी इच्छेचे रूपांतर 'आजारी माणसाची सेवा ही झालीच पाहिजे' अशा वैश्विक रुपात बदलते.कर्म करताना अनासक्तिरुप जे कौशल्य लागते त्याचा अर्थ आपल्या कर्मामागील प्रेरणा कर्तव्यभावनेची असावी, अहंकारयुक्त वासनेची असू नये असा होतो. *'समत्वं योग उच्यते'* व *'योग: कर्मसु कौशलम्'* या दोन व्याख्यांचा फलितार्थ एकच येतो. तो असा की, कर्म युक्त ठरण्यासाठी फलाविषयीची प्रेरणा आसक्ती न ठेवता कर्तव्यभावना ही प्रेरणा राखली पाहिजे.

गीता म्हणते,कर्माच्याच ठिकाणी तुझा अधिकार ठेव, फलाच्या ठिकाणी तो कधीच नसो. *कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ।* (2.47). फलाच्या ठिकाणी अधिकार नसावा हे तर उघडच आहे. माझ्या कृतीचे फल म्हणजे सृष्टीतील अनंत कारणव्यापारावरील एकत्रित परिणाम आहे. त्या सर्वांवर माझा ताबा नाही, पण माझ्या कर्मावर माझा अधिकार आहे ! ते मी नियंत्रणात आणू शकतो. ते करणे मला शक्य आहे. म्हणून कर्म म्हणजे कर्तव्यबुध्दीतून स्फुरणारा कृतिसंकल्प होय.माझा अधिकार चालतो फक्त कर्तव्यभावनेवर, म्हणून 'कर्मण्येवाधिकारस्ते' या वचनातील कर्म याचा अर्थ कर्तव्यभावनेतून निर्माण झालेली कर्मविषयक प्रेरणा असा घेतला पाहिजे.कारण, तीवरच माझा खरोखर अधिकार आहे.नैतिक मूल्य तिलाच आहे.

## उपनिषदांतील सत्ताशास्त्र आणि सांख्य दर्शनातील सत्ताशास्त्र

गीतेत सर्वत्र उपानिषदांची वचने आलेली असली तरी गीतेने अनेक सिध्दान्ताचा समन्वय केलेला आहे.उपनिषदे गायरूप असून गीता हे दूध असले तरी गीतेत नंतर भागवतपंथातील विचारांचे मिश्रण झालेले आहे.अर्थात हे हेतूपूर्वक झालेले नसून 'उत्स्फूर्तपणे' झालेले आहे.तसेच गीतेवर सांख्यमताचाही प्रभाव असावा, असे वाटते.अर्थात उपानिषदातील सत्ताशास्त्र आणि सांख्य दर्शनातील सत्ताशास्त्र यांच्यात साम्य आहे.सांख्यमत उपनिषदांइतकेच प्राचीन आहे.त्यामुळे हा प्रभाव पडलेला असावा. भागवतपंथाने त्याचा उपयोग करून घेतला व ईश्वरवादाची मांडणी केली.


Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



उपनिषदांमध्ये ब्रह्म,आत्मा आणि जगत ही एकाच ब्रह्माची विविध अंगे मानली आहेत.अर्थात या तीनात भेद आहे, असे नाही,तर गीता तिघांना वेगळे मानते, व समानही मानते.उपनिषदांनी ब्रह्म हे भौतिक जगाचे मूलकारण मानले तर गीतेने प्रकृति किंवा जडद्रव्य हे कारण मानले.

गीताकालीन सांख्य व कापिलाचे सांख्यदर्शन यांच्या सिध्दान्तात काही साम्य असले तरी एकरुपता नाही. **साम्य** असे की

(1) आत्मा अथवा पुरुष हा शरीरभिन्न असून असंग, अकर्ता आणि अविकारी आहे हा सिध्दान्त दोन्ही ठिकाणी आहे.

(2) तसेच आत्मभिन्न गोष्टी प्रकृतीचे विकार असून सत्व, रजस् व तमस् हे प्रकृतीचे गुण आहेत हा विचारही दोहोंना समान आहे.

(3) प्रकृतीचे गुण बंधनकारक असल्यामुळे व्यक्तीने गुणातीत होणे अथवा निस्त्रैगुण्यदशा अनुभवणे हा पुरुषार्थ आहे हे मतही, गीतेतील सांख्य व सांख्यदर्शन या दोहोंना जोडणारे आहे.

पण या दोन्ही सांख्यमतांतील **फरक** ही महत्वाचे आहेत. ते असे,-

(1) सांख्यदर्शनातील पुरुष व प्रकृति ही अनादी आणि अंतिम तत्वे असून त्यांना परस्परांना साधणारी कोणतीच तत्त्वे त्या दर्शनात उपलब्ध नाहीत.सांख्याच्या मते ती मूलत: भिन्न आहेत.तर गीतेच्या प्रतिपादनानुसार पुरुष व प्रकृति यांच्याही पलीकडे आणि त्यांच्याहून श्रेष्ठ असे परमात्मा, ईश्वर अथवा पुरुषोत्तम नावाचे तत्व आहे (गीता 15.17 व 18 ).याचा अर्थ एवढाच नव्हे की गीतेतील सांख्य मत हे पातञ्जल योगमताप्रमाणे सेश्वर सांख्य मत आहे.योग दर्शनातील ईश्वर हा पुरुष आणि प्रकृती यांचा आधार नाही.अनेक पुरुषांपैकी तो एक आहे एवढेच.पण सर्व ब्रह्माण्डच वासुदेवमय आहे अशी गीतेची धारणा आहे.ईश्वर सर्वाधार आहे.

(2) पुरुष अनेक असून प्रत्येक पुरुष दुस-या पुरुषाहून सर्वस्वी अलग अहे असा कापिल सांख्य दर्शनाचा एक प्रमुख सिध्दान्त आहे. पुरुषांचे हे बहुत्व गीतेत आवर्जून कोठेच सांगितले नाही. उलट गीतेच्या मते सर्व भूतांच्या अंतर्यामी एकच ईश्वरतत्व खेळते (18.61).

(3) सांख्यदर्शनातील पुरुष भोक्तृत्वरहित आहे पण गीतेतील पुरुषास भोक्तृत्व आहे (13.21). (4) गीतेत प्रकृतीला तरुन जाण्यास अवघड अशी ईश्वराची गुणमयी माया. (7. 14) असे संबोधले आहे. सांख्य दर्शनामध्ये पुरुषाने प्रकृतीला ओलांडून आणखी पुढे कोठे तरी जावयाचे आहे अशाी अपेक्षा नाही. त्याने फक्त प्रकृतीहून आपला अलगपणा ओळखावा एवढीच अपेक्षा आहे. मायेने सत्य आच्छादले जाते ही कल्पना गीतेत आहे. योगमायेने परमेश्वराला संपूर्ण आच्छादल्यामुळे परमेश्वर प्रत्येकाला स्पष्ट दिसत नाही. (7. 25). मायेने ज्ञानाचे अपहरण होते असेही गीतेत म्हटले आहे.सांख्यांची प्रकृति त्रिगुणात्मक आहे तर गीतेतील प्रकृती अष्टधा आहे. हा ही महत्वाचा फरक आहे.

गीतेतील सांख्य मत व सांख्य दर्शनातील तत्वज्ञान यांच्यावर केलेल्या तुलनेवरुन असे वाटते की गीतेतील सांख्यविविचार हा उपनिषदांमध्ये मुळे असणा-या नंतर विकसित झालेल्या सांख्यदर्शनाच्या ऐतिहासिक विकासातील एक टप्पा असावा.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

# ज्ञानयोग, कर्मयोग आणि भक्तियोग

ही त्रिसूत्री भारतीय तत्वज्ञानात अतिशय महत्वाची आहे. अद्वैत वेदांताच्यामते ज्ञान मार्ग, कर्म मार्ग आणि भक्ती मार्ग एकाच उदिष्टाकडे आहेत. ते म्हणजे मोक्ष.उद्दिष्ट एकच असले तरी माणसाचे स्वभाव लक्षात घेवून मोक्षाचा मार्ग ठरविता येतो. ज्याला ज्ञान विषयी प्रेम असेल तो ज्ञानमार्ग स्विकारेल. जो कर्तव्य परायण असेल तो कर्ममार्गी होईल.ज्यास ईश्वरभक्तीत तल्लीनता साधला येते तो भक्तीमार्ग साधेल.गीतेनेही या तिन्ही मार्गांचे अनुकरण केले आहे. त्यांचे स्वरुप पुढीलप्रमाणे.



## (1)ज्ञानमार्ग :

पुरुषार्थ सिध्दांतातील शेवटचा पुरुषार्थ मोक्ष हेच माणसांचे अंतिम उद्दिष्ट असले पहिजे. ते ज्ञान,कर्म आणि भक्ती या तीन मार्गाने मिळविता येते. ज्ञान मार्ग अभ्यासकासाठी, कर्म मार्ग कर्तव्य करण्यासाठी आणि भक्तीमार्ग भोळया भाबडया जनतेसाठी उपलब्ध आहे. ज्ञान मार्गाला ' ज्ञानयोग ' असेही म्हटले आहे. ज्ञानाला जोडले जाणे म्हणजे ज्ञानाशी योग साधणे होय. ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान,तत्त्वज्ञान.ज्ञान शाब्दिक नसून आत्मानुभवावर आधारित आहे.तो साक्षात्कार आहे.वेदान्ताच्या मते ज्ञानमार्गाला जातिवर्णाची आडकाठी नाही.पण साधक चार प्रकारची साधना करावी लागते, असे शंकराचार्य म्हणतात. ती चार साधने अशी :

(1) **नित्य अनित्य वस्तुविवेक :** ब्रह्म व माया म्हणजे या दृष्य जगाचे स्वरुप जाणणे.
(2) **इहामुत्रफलभोगविराग :** कर्मफलापासून मुक्त असणे.
(3) **शमादिसाधनषट्संपत्ति :** माणूस म्हणून आपल्या क्षमता शम आणि दम आदी साधनसंपत्ती जाणणे.
(4) **मुमुक्षत्त्व :** संन्यासी वृत्ती बाणविणे.

या चार साधनांनी कोणतीही व्यक्ती ज्ञान मार्गाची अधिकारी होते.या चारांना ' *साधन चातुष्ट्य* ' असे म्हणतात. ती साधणारी ती ***'साधक '*** होय. साधकाने करावयाची ती साधना आहे. साधना करणे म्हणजे तप करणे.साधनेचे ज्ञान गुरुकडून घ्यावयाचे असते.तो गुरुमंत्र.कोणते ज्ञान घ्यावयाचे ? तर "ब्रह्याचे ज्ञान'. ज्ञानमार्ग, कर्ममार्ग,भक्तीमार्ग या तीनात ज्ञानमार्ग उत्तम समजला जातो अर्थात या मार्गात व इतर मार्गात कसलाही फरक नाही.ज्या व्यक्तिचा जो व जसा अभ्यास असेल तसा त्याने मार्ग घ्यावयाचा असतो एवढेच.

ज्ञानमार्गी होण्यासाठी वर्णजात किंवा स्त्री पुरुष भेद असे बंधन नाही. पण साधकाने ' *साधन चातुष्ट संपन्न* ' असले पाहिजे.त्यासाठी व्यक्तीला काही एक धर्म शिक्षण असले पाहिजे, ही अट आहे. तथापि येथेच एक अडचण निर्माण होते कारण धर्म हा पुरुषार्थ आहे. वर्ण व्यवस्थेनुसार तो केवळ उच्च वर्णीयांनाच उपलब्ध आहे. शूद्रांना व स्त्रियांना उपलब्ध नाही.

गीतेतील ज्ञान हा शब्द ज्ञानयोग या संदर्भात वेगळ्या अर्थाचा आहे. हा ज्ञानयोग म्हणजे भक्तियोग, ध्यानयोग अथवा कर्मयोग अनुसरून 'जेथे गेल्यावर आत्मा परत येत नाहीत, त्या परमधामास (15.6) पोचण्याचा एक मार्ग आहे.ज्ञानयोग ही एक जीवननिष्ठा आहे. ती सांख्यांची होय.(33) असे तत्कालीन परिभाषा वापरुन गीता सांगते.सांख्यनिष्ठेत कर्मसंन्यास विहित होता.ज्ञानयोग, सांख्यनिष्ठा आणि कर्मसंन्यास हे शब्द एकमेकांचे पर्याय म्हणूनही येतात.(3.3, 5.2).

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

पुरुषार्थ सिध्दांत एक आदर्श म्हणून तो सर्वांना उपलब्ध असला तरी व्यवहारात तो पक्षपाती आहे.' सर्व ' या विशेषणात समाजातील सर्वजण येत नाही.त्यात मुख्यत: ब्राह्मण व काही अंशी क्षत्रिय ; तेही पुरुषच येतात.स्त्रिया येत नाहीत. त्यामुळे ज्ञानमार्ग पक्षपाती आहे असे म्हणावे लागते.म. जोतिरावा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा तोच तर मुख्य आक्षेप होता.

## (2)कर्ममार्ग



कर्म करणे याचा अर्थ निष्काम कर्म करणे. असे कर्म करणाऱ्याला कर्मयोगी असे म्हणतात. ज्ञानयोग व कर्मयोग यात उच्चनीच असा भेद नाही. तरीही कर्मयोग श्रेष्ठ आहे, असा कर्ममार्गाचाच दावा आहे. खरेतर जे अभ्यासक नाहीत, ज्यांना अभ्यासाऐवजी कर्म करणाऱ्याचे काम आहे त्याच्यासाठी कर्म मार्ग आहे.

कर्म योगाचा पुरस्कार मुख्यत: भगवत गीतेने केलेला आहे. गीतनुसार कर्म म्हणजे फक्त निष्काम कर्म.फलाच्या अपेक्षेने केलेले कोणतेही कर्म नाही. आपले विहित कर्म केल्यास व्यक्तीला मोक्ष मिळतो , असे गीता सांगते. हे निष्काम कर्म स्वधर्मानुसार करावयाचे आहे. पण स्वधर्म म्हणजे पुन्हा वर्णानुसार कर्म करावयाचे.ते निष्काम असले पाहिजे अशा नि:ष्काम कर्माला *' निष्काम धर्म* किंवा *' नैष्कर्म्य सिध्दी '* असे म्हणतात. त्याचा अर्थ कर्म करुन ही ते न करण्याची सिध्दी म्हणजेच कर्म फलातून सुटणे . म्हणजेच मोक्ष मिळविणे हा मार्ग सर्व व्यक्तीसाठी खुला आहे. कर्म हा शब्द गीतेत अनेक अर्थांनी आला आहे.

1) आपल्या हातून घडणारी कोणतीही कृती म्हणजे कर्म.पाहणे, ऐकणे, स्पर्श करणे यांसारख्या गोष्टीही आल्या.(5.8).
2) 'यज्ञयागादी वैदिक कर्म' असा दुसरा एक अर्थ गीताकारांच्या मनात आहे.वैदिक कर्मकांडाविषयी गीतेला आस्था नाही. दुस-या अध्यायातील श्लोक 42 ते 46 पर्यंत 'वेदवातरतां' चा उपहास आहे. वेद भौतिक कामनांच्या पूर्तीसाठी ते आहेत. पण पारमार्थिकाने निस्त्रैगुण्य व्हावयास हवे असे तेथे म्हटले आहे. 'श्रुतिवचनांमुळे तुझी बुध्दी गांगरलेली आहे' (2.53) असेही म्हटले आहे. नवव्या अध्यायातील श्लोक 20-21 मध्येही प्रच्छन्न वेदनिन्दा आहे. तेथे म्हटले आहे की, तीनही वेदांत सांगितलेले यज्ञ केल्याने स्वर्गसुखे मिळतील, पण ती भोगल्यावर क्षीणपुण्य होऊन परत या मर्त्य लोकात यावे लागेल.'सर्व यज्ञांमध्ये मी जपयज्ञ आहे' (10.25) असे शब्द श्रीकृष्णाच्या तोंडी घालण्यानेही गुंतागुंतीच्या श्रौत यज्ञांची निंदाच केलेली आहे.
3) तिसरा अर्थ म्हणजे समाजातील व्यक्तीच्या विशिष्ट स्थानामुळे जो तिचा 'स्वधर्म' ठरतो ते कर्म. यास ते 'सहज-कर्म' (18.48) हा शब्द वापरतात. हा शब्द स्वधर्म याचाच पर्याय होय. सह - ज म्हणजे जे त्या व्यक्तीच्या बरोबरच जन्मते, म्हणजेच त्याच्या स्वभाव प्रकृतीने नियत होते ते.नियत कर्म हे केलेच पाहिजे. आपण स्वत:ही ते करतो असे श्रीकृष्णांनी सांगितले.श्रेष्ठ लोकांचे अनुकरण इतर लोक करतात.त्यांनीच जर नियत कर्मांचा (कदाचित, त्यांच्यापुरता समर्थनीय) त्याग केला तर लोकोच्छेद होईल.कर्मयोगाचे निरुपण करताना हे सामाजिक स्वरुपाचे कर्म गीताकारांच्या मनात प्रामुख्याने आहे.नाही तर, 'लोकसंग्रहासाठी कर्म कर', 'मी कर्म केले नाही तर लोकोच्छेद होईल' अशा त-हेचे युक्तिवाद गीतेत आले नसते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

4) आत्मशुध्दीस उपयोगी पडणारी उपासनादी कर्मे असा चौथाही एक अर्थ 'कर्म' या शब्दाचा गीतेत आहे. अठराव्या अध्यायातील पाचव्या श्लोकात यज्ञ, दान, तप ही कर्मे मनाला पावन करणारी आहेत, म्हणून ती सोडू नयेत असे म्हटले आहे.त्या ठिकाणी हा चौथा अर्थ विवक्षित आहे.

या चारींपैकी कोणत्याही अर्थाने घेतले तरी 'कर्म' सुटत नाही म्हणूनच जे कर्म करावयाचे ते अनासक्त बुध्दीने केलेले असावे असे गीतेच्या कर्मयोगाचे प्रतिपादन आहे. ऐहिक आणि पारलौकिक सुखासाठी वेदांनी सांगितलेल्या कर्मकांडात रमून राहणा-यांची कर्मनिष्ठा आणि गीतेतील कर्मयोग ही निष्ठा या भिन्न गोष्टी आहेत.

9

तथापि हा मार्ग सुध्दा व्यवहारात पक्षपातीच आहे.निष्काम कर्म योगाचे गाजर दाखवून प्रत्यक्ष व्यवहारात वर्ण, जात, लिंग भेद करुन विविध प्रकारे स्त्री व शुद्रांची शोषण व्यवस्था राखली गेली, असेच दिसेल. ज्ञानयोग ,कर्मयोग तात्त्विक अर्थाने उच्च, निष्पक्ष असले तरी व्यवहारात त्याची अंमल बजावणी मात्र पक्षपातीच होते. स्त्री आणि शुद्र हे गुलामच राहिले आहेत. त्या सर्वांना खऱ्या अर्थाने उपलब्ध झाला ते भक्ती मार्ग.

## (3) भक्तिमार्ग

ज्ञानयोग व कर्म योग न जमल्यास व्यक्तीने भक्तिमार्ग अवलंबवावा. हा मार्ग मात्र सर्वांसाठी होता.या मार्गाचा उदय प्राचीन काळात असला तरी त्याचा विकास मात्र 12 व्या शतकात सुरु झाला .संत ज्ञानेश्वरांनी भक्ती मार्गाचा पाया रचला आणि नंतर तो सर्व भारतभर पसरला. खरे तर तामिळनाडूमध्ये भक्तीमार्ग अळवार संतांच्या रुपात सातव्या शतकात उगम पावला होता. तो हळू हळू कर्नाटकातून महाराष्ट्रात आला. त्याला महाराष्ट्रीन भक्ती मार्गाची जोड मिळून तो बंगाल, बिहार, गुजरात, ओरिसा असा उत्तर भारतात पसरला.हा भक्तिमार्ग म्हणजे ' भागवत संप्रदाय ' होय.मध्ययुगात सारा भारत एक करण्यात भक्तिमार्गाने फार मोठे योगदान दिले. विशेषत: संत नामदेवांनी भारतभर भागवत संप्रदायाची उभारणी केली.

ज्ञानयोगाप्रमाणेच भक्तियोगही कर्मयोगाचे अंग म्हणून राहू शकेल आणि एक स्वतंत्र मोक्षमार्ग म्हणूनही अवलंबता येवू शकेल. ज्ञानयोगात अव्यक्ताच्या दिशेने वाटचाल असल्याने तो कठिण आहे (12.5). भक्तीत सगुणोपासना असल्याने ती सोपा आहे.ज्ञानयोगाच्या साहाय्याने अहंकाराच्या भिंती पाडून टाकून कर्मयोगातील निष्कामता साधण्यापेक्षा कर्माची फले ईश्वरार्पण करुन अनासक्त राहणे अधिक सोपे. म्हणून जे जे करशील, खाशील, हवन करशील, देशील अथवा तप करशील ते परमेश्वराला अर्पण कर (9.27).कर्मयोगाला उपकारक होते एवढेच भक्तीचे माहात्म्य नाही तर तो स्वतंत्र मोक्षमार्गही आहे. दुराचारी माणसाने परमेश्वराने अनन्यभावाने भक्ती सुरु केली तरी त्याला साधूच मानावे, कारण त्याच्या बुध्दीचा योग्य तो निश्चय झालेला असतो.(9.30). परमेश्वराचा भक्त नष्ट होणार नाही असे प्रतिज्ञेवर सांगितले आहे. (9.31). भक्तीने अखेर तो परमेश्वरालाच येऊन मिळेल.(9.2) म्हणून सर्व धर्म टाकून केवळ परमेश्वरालाच शरण जा.(18.66)

ईश्वर भक्ती सुध्दा कर्माप्रमाणेच निष्काम भक्ती होय.निष्काम असेल तर भक्तिमागाने तरच मोक्ष प्राप्त होतो. परमेश्वरावर नितांत प्रेम करणे. त्याच्याशी स्वरुप होणे. व मोक्ष मिळविणे हाच भक्ती मार्ग होय.भक्ती मार्गाने विशिष्ट प्रकारचे पंथ संप्रदाय निर्माण केले उदा. नाथ, महानुभाव, रामदासी ,वारकरी हे महाराष्ट्रातील तर दक्षिण भारतात अलवार, पंचशिख, राधास्वामी, वैष्णव, हे संप्रदाय आहेत तर कर्नाटकात भक्त पुरणदास, कंनकदास, अक्क महादेवी, रंगदास, आणि उत्तर भारत - तुलसीदास, सुरदास , कबीर, मीराबाई, नरसी मेहता असे विविध संत निर्माण केले. एवढेच नव्हे तर या भक्तीमार्गाने ईस्लाम धर्माला सुध्दा आपल्यात

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

सामावून घेतले. शिख धर्म आपला केला. तुकारामाचा गुरु मुसलमान सुफीसंत होता. 20 शतकात नगर जिल्हयात असाच एक सुफी साधू होऊन गेला . तो म्हणजे शिर्डीचा साईबाबा.



## स्थितप्रज्ञ : एक आदर्श पुरुष

कर्म युक्त ठरते ते असक्त म्हणजे अनासक्त बुध्दीने केल्यानंतरच. पण त्याचा अर्थ असा नव्हे, एकदा आसक्ती सोडल्यावर काहीही करावे, कसेही वागावे.कार्य कर्म कोणते, त्याचा आशय काय, त्याचे स्वरूप व त्याची उद्दिष्टे कोणती ? हे प्रश्न राहतातच.या प्रश्नाला गीतेने दिलेले एक उत्तर म्हणजे आदर्श पुरुषाची संकल्पना होय. ती अशी :

योगस्थ बुध्दीला कार्य कर्म कोणते ते सहजच कळते.*'योगस्थ: कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय'।* (2.48). योग प्राप्त करुन घेण्यासाठी आधी बुध्दी निश्चल करावी लागते, अचल करावी लागते, व्यक्तीस स्थितप्रज्ञ व्हावे लागते.(2.17). ज्याची बुध्दी अथवा प्रज्ञा स्थित आहे तो स्थितप्रज्ञ स्थितप्रज्ञाची लक्षणे गीतेत विस्ताराने सांगितली आहेत.(2.55-72).स्थितप्रज्ञाची बुध्दी ही निखळ बुध्दी होय.ती निर्भय आणि निरहंकारी असते. या बुध्दीला जे कर्म कार्य म्हणून प्रतीत होते ते निरासक्तपणे करावे.बुध्दी अहंकाराने झाकळून गेली म्हणजे कधीकधी अकार्य हे कार्य वाटू लागते.

ध्यानयोग, भक्तियोग, सांख्यनिष्ठा, कर्मनिष्ठा या सर्वाचा समन्वय गीतेत आहे.आजच्या युगाशी संदर्भ राखण्यासाठी कर्मयोग हे गीतेचे तात्पर्य मानता येईल. गीतेत चार पाच ठिकाणी गीताकारांनी आदर्श पुरुषांचे चित्र रेखाटले आहे.कधी त्याला स्थितप्रज्ञ म्हटले, कधी भक्त म्हटले, कधी गुणातीत (ज्ञानी) म्हटले पण प्रत्येक ठिकाणी ते एकाच आदर्शाचे चित्र आहे हे सहज दिसून येते.आदर्श पुरुषांची दोन वर्णने करता येतील.

स्थितप्रज्ञ (अध्याय 2) : मनात रुतून बसलेलया सर्व वासना स्थितप्रज्ञ सोडुन देतो.तरीही तो संतुष्ट असतो.त्याच्या संतोषाचे निधान त्याला स्वत:च्या स्वरुपातच सापडलेले असते.दु:खामुळे तो वैतागून जात नाही. सुखासाठीही तो आसुसलेला असत नाही.आसक्ती,भय,क्रोध ही त्याला सोडुन गेलेली असतात.

भक्त (अध्याय 12) : भक्ताची सर्व भूतमात्राविषयी निवैर बुध्दी असते इतकेच नव्हे तर त्यांच्याविषयी तो प्रेम आणि करुणा बाळतो.तो क्षमावान निरहंकार असतो.सुखे - दु:खे त्याला सारखीच. तो प्रयत्नशील आणि निश्चयाचाही पक्का असतो.लोक त्याचा कंटाळा करीत नाहीत आणि तोही लोकांचा कंटाळा करीत नाही.तो पवित्र असतो आणि दक्षही असतो.कशाचीही अपेक्षा धरुन तो राहात नाही.मित्र आणि शत्रू यांच्याशी तो सारख्याच प्रेमाने वागेल.कोठे सन्मान झालयास तो हुरळून जात नाही आणि कोणी अपमान केलयास खट्टू होत नाही. परमेश्वराविषयी त्याला गाढ भक्ती असते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade,hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



Department Of Philosophy, Sang